**MHAH230007472019**

**<u>विशेष दिवाणी दावा क्र.४०/२०१९ मधील नि.३९ वरील आदेश</u>**

**<u>(पांडुरंग शिवराम काळाणे वि. लक्ष्मण अंकुश लबडे)</u>**

**१.** अर्ज व म्हणणे पाहिले. वादीचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** मयत वादीचे वारसांनी अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द खरेदीखत बेकायदेशीर ठरवून मिळणेकामी व निरंतरचे ताकीद मनाई आदेशासाठी दाखल केलेला आहे. वादी पांडुरंग शिवराम काळाणे हे दि.२०.०१.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. मयत वादी यांना पत्नी, दोन मुले व एक मुलगी असे कायदेशीर वारस आहेत. तरी वादीचे नावापुढे मयत असा शब्द लिहून त्याखाली अर्जामध्ये नमूद वारस नमूद करण्यात यावेत अशी विनंती मयत वादीचे वारसांनी केली.

**३.** प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शवला. त्यांचे मते अर्ज कायदेशीर नाही. मयत वादी यांना केवळ अर्जदार हेच वारस आहेत असे दर्शवणारा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली.

**४.** अभिलेख पडताळला. वादीने नि.क्र.३४ अन्वये दाखल केलेले वादी पांडुरंग शिवराम काळाणे यांचे मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांचा मृत्यू दि.२०/०१/२०२५ रोजी सुर्या सह्याद्री हॉस्पीटल पुणे येथे झालेला असून सदर प्रमाणपत्र दि.२८/०१/२०२५ रोजी देण्यात आले आहे. प्रस्तुत अर्ज दि.१६/०७/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. तसेच वादी क्र.१ब यांनी अर्जातील कथनासाठी स्वतःचे शपथपत्र नि.४० वर दाखल केलेले आहे. प्रस्तुतचा दावा हा वादीने खरेदीखत बेकायदेशीर ठरवुन मिळणेसाठी व निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे मयत वादी पांडुरंग शिवराम काळाणे यांचे प्रस्तवित वारस रेकॉर्डवर आणणे न्यायोचित ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज नि. ३९ मंजूर.

२. मयत वादीचे वारसांची नावे वादीचे नावापुढे मयत असे लिहिण्यात येऊन त्याखाली नमूद करण्यात यावीत व विहीत मुदतीत दुरुस्ती करण्यात येऊन

दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करण्यात यावी.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.10.28 17:19:43 +0530

श्रीगोंदा.
दिनांक - २८/१०/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.